पुण्यनगरी

# पाश्चिमात्य आणि दाक्षिणात्य वाद्यांच्या मिलाफ

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

पाश्चिमात्य वाद्य आणि दाक्षिणात्य वाद्य यांचा मिलाफ साधणारे दुर्मीळ आणि पारंपरिक वेगवेगळ्या वाद्यांचे सादरीकरण एकाच व्यासपीठावर सादर करण्यात आले.

शिवाजी विद्यापीठ ५९ व्या दीक्षांत समारंभाच्या निमित्ताने बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्त्रोत केंद्र, तसेच संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दीक्षांत समारंभानंतर स्नातक विद्यार्थ्यांसाठी जागर दुर्मीळ वाद्यांचा व भावतरंग या बहारदार गाण्यांचा कार्यक्रम विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब सभागृहामध्ये आयोजित करण्यात आला.

यामध्ये ढोलकी, पखवाज, दिमडी, हलगी, धनगरी ढोल, संबळ या महाराष्ट्रीयन वाद्यांद्वारे लावणी, वाघ्या मुरळी, गोंधळ, नमन, दशावतार, गण-गवळण, पोवाडा यांचे उत्तम सादरीकरण करण्यात आले. थविल, मुरासु, उडुम्मई, इडम्मा, इदालम, मोडा मेलम, कोट्टू मेलम, चेंडा, मृदंगम, गंजिरा, सिंगारी मेलम, थप्पू, पराई, पंबई ईसाई या दाक्षिणात्य वाद्यांद्वारे हरिनाम संकीर्तन, सलंगाई मेलम, देवी श्लोक, गणेश स्तुती यांचे संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाचे विद्यार्थी ऋषीकेश देशमाने व साथीदार यांनी केले. त्यानंतर भावतरंग या गायनाच्या कार्यक्रमामध्ये लोकगीत, भावगीत, सिनेगीत, भक्तिगीत, प्रेमगीत, लावणी, द्वंद्वगीत यांचा बहारदार आणि मंत्रमुग्ध करणारा कार्यक्रम संगीत अधिविभागाच्या विद्यार्थ्यांनी सादर केले.

यावेळी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. रामचंद्र पोवार, डॉ. शरद बनसोडे, डॉ. प्रकाश गायकवाड, डॉ. अंजली निगवेकर, डॉ. विनोद ठाकूर-देसाई, निखिल भगत, डॉ. धनंजय सुतार, डॉ. प्रकाश बिलावर आदी उपस्थित होते.

पुण्यनगरी

# डॉ. सुखदेव थोरात यांना डॉ. जे. एफ. पाटील स्मृती पुरस्कार

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील माजी अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. जे. एफ. पाटील यांच्या स्मृतिनिमित्त दिला जाणारा प्रथम पुरस्कार विद्यापीठ अनुदान आयोगाचे माजी अध्यक्ष प्रा. डॉ. सुखदेव थोरात यांना जाहीर झाला आहे.

पुरस्कार प्रदान समारंभ कुलगुरू प्रा. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते दि. ३१ मार्च रोजी दुपारी ४.३० वाजता शिवाजी



विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहामध्ये होणार आहे. डॉ. थोरात हे विख्यात अर्थतज्ज्ञ असून, अनेक केंद्रीय संस्थांचे ते प्रमुख राहिलेले आहेत. वर्ष २००८ मध्ये भारत सरकारने अनेक विद्यापीठांकडून त्यांना डी. लिट. पदवीने सम्मानित केले आहे. त्यांना पद्मश्री पुरस्कारही मिळाला आहे.

लोकमत

# पहिला जे. एफ. पाटील स्मृती पुरस्कार सुखदेव थोरात यांना

## आज वितरण : विद्यापीठात कार्यक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क



**कोल्हापूर** : महाराष्ट्रातील ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ प्रा. डॉ. जे. एफ. पाटील यांच्या नावे दिला जाणारा पहिला स्मृती पुरस्कार गुरुवारी केंद्रीय लोकसेवा आयोगाचे माजी अध्यक्ष प्रा. डॉ. सुखदेव थोरात यांना जाहीर झाला. हा पुरस्कार दोन वर्षांतून एकदा दिला जाणार आहे. ५१ हजार रुपये रोख मानपत्र, सन्मान चिन्ह, शाल, श्रीफळ, असे पुरस्काराचे स्वरूप आहे. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते शुक्रवारी (दि.३१) दुपारी ४:३० वाजता शिवाजी विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहात पुरस्कार वितरण होणार आहे.

प्रा. डॉ. जे. एफ. पाटील यांचे अर्थशास्त्रातील भरीव योगदान हे सबंध महाराष्ट्रात परिचित आहे. त्यांचे शैक्षणिक शेत्रातील कार्य

अतुलनीय आहे. आर्थिक, सामाजिक, शिक्षणविषयक अशा अनेक विषयावर विपुल लेखन केले आहे. त्यांच्या बहुमोल योगदानाची स्मृती चिरंतन राहावी यासाठी शिवाजी विद्यापीठ अर्थशास्त्र परिषदेतर्फे विद्यापीठास त्यांच्या नावे पुरस्कार सुरू करण्याबाबतचा प्रस्ताव सादर केला होता. विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेने तो मान्य केला. पुरस्कार विजेते थोरात हे विख्यात अर्थतज्ज्ञ असून अनेक केंद्रीय संस्थाचे ते प्रमुख राहिलेले आहेत. वर्ष २००८ मध्ये भारत सरकारने त्यांना पद्मश्री या पुरस्काराने सन्मानित केले. ते देश- विदेशातील अनेक विद्यापीठांचे मानद प्राध्यापक म्हणून सध्या कार्यरत आहेत.

31 MAR 2023 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'नॅक' मूल्यांकनात महाराष्ट्र आघाडीवर

## एक हजार ८६९ संस्थांची प्रक्रिया पूर्ण

NAAC
NATIONAL ASSESSMENT AND ACCREDITATION COUNCIL

▸ **संतोष मिठारी : सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ३० : विविध ३५ विद्यापीठे आणि एक हजार ८३४ महाविद्यालये अशा एकूण एक हजार ८६९ शैक्षणिक संस्थांचे नॅक (राष्ट्रीय मूल्यांकन आणि प्रमाणपन परिषद) मूल्यांकन पूर्ण करीत देशातील ३६ राज्यांमध्ये महाराष्ट्र आघाडीवर आहे. मूल्यांकन पूर्ण ९१४ संस्थांसह कर्नाटक व ८७२ संस्थांसह तमिळनाडू महाराष्ट्राच्या पाठोपाठ आहेत.

### 'परिसस्पर्श' वाढविणार संख्या

■ राज्यात ४५ विद्यापीठे आणि चार हजार ५३४ महाविद्यालये अशा एकूण चार हजार ५७९ शैक्षणिक संस्था आहेत. पैकी एक हजार ८६९ संस्थांचे मूल्यांकन पूर्ण असून, उर्वरित दोन हजार ७१० संस्थांची प्रक्रिया सुरू आहे. या संस्थांच्या मूल्यांकनातील अडचणी सोडविण्यासाठी राज्य शासनाने परिसस्पर्श योजना राबविण्याचा निर्णय घेतला. या अंतर्गत १७५ महाविद्यालयांची मार्गदर्शक म्हणून निवड करून ती प्रत्येकी पाच महाविद्यालयांना मूल्यांकनासाठी मदत करणार आहेत. त्यामुळे 'परिसस्पर्श' योजना मूल्यांकन पूर्ण संस्थांची संख्या वाढविणार आहे.

महाराष्ट्रातील उच्च व तंत्रशिक्षण विभागाने शैक्षणिक संस्थांना नॅक मूल्यांकनासाठी सहा महिन्यांची मुदतवाढ दिली. त्या पार्श्वभूमीवर राज्याच्या स्थितीचा आढावा घेण्यात आला. 'नॅक'च्या मूल्यांकन आणि मान्यताद्वारे कोणत्याही शैक्षणिक संस्थेचा दर्जा, शैक्षणिक गुणवत्ता ओळखली जाते. बंगळूर येथील 'नॅक'द्वारे देशभरातील विविध राज्यांतील विद्यापीठ, महाविद्यालयांचे

पान ८ वर ››

" महाराष्ट्रात उच्च शिक्षणातील दर्जा, गुणवत्ता राखण्याबाबत जाणीव अधिक आहे. त्यामुळे देशात आपले राज्य आघाडीवर आहे. शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील ज्या शैक्षणिक संस्थांचे मूल्यांकन अद्याप पूर्ण झालेले नाही, त्यांना ते पूर्ण करण्यासाठी मदत केली जाईल.
**- डॉ. दिगंबर शिर्के**, कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

" शासन आणि उच्चशिक्षण विभागाच्या सकारात्मक धोरणाचा परिणाम म्हणून 'नॅक' मूल्यांकनात देशात महाराष्ट्र अव्वल आहे. राज्यातील बहुतांश शैक्षणिक संस्थांनी मूल्यांकनाची चौथी फेरी पूर्ण केली. या संस्थांची संख्या आणखी वाढेल.
**- डॉ. आर. के. कामत**, कुलगुरू, डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठ

### देशातील आकडेवारी

| | |
|---|---|
| एकूण विद्यापीठे | १ हजार ११३ |
| महाविद्यालये | ४३ हजार ७९६ |
| विद्यार्थी संख्या | ४ कोटी १४ लाख |
| शिक्षकांची संख्या | १५ लाख ५० हजार |



### पहिली दहा राज्ये

| राज्य | मूल्यांकन झालेल्या संस्था |
|---|---|
| महाराष्ट्र | १८६९ |
| कर्नाटक | ९१४ |
| तमिळनाडू | ८७२ |
| उत्तर प्रदेश | ६४१ |
| गुजरात | ५१५ |
| पश्चिम बंगाल | ४१७ |
| आंध्र प्रदेश | ३८९ |
| हरियाना | ३५१ |
| मध्य प्रदेश | ३४३ |
| ओडिशा | ३०४ |

### श्रेणीनिहाय संस्था

| | |
|---|---|
| अ | २,०२२ |
| ब | ५,९९६ |
| क | १,०९४ |

## 'नॅक' मूल्यांकनात महाराष्ट्र आघाडीवर

›› पान १ वरून

मूल्यांकन केले जाते. मूल्यांकनात संबंधित शैक्षणिक संस्थेची कामगिरी, अभ्यासक्रमाची निवड आणि अंमलबजावणी, विद्यार्थ्यांचे निकाल, प्लेसमेंट, संशोधन कार्य, विद्याशाखा सदस्यांचे प्रकाशन, मूलभूत सुविधा, संसाधनांची स्थिती, विद्यार्थी सेवा आदींची तपासणी केली जाते.

**विद्यापीठात मूल्यांकनप्राप्त १७१ महाविद्यालये**

शिवाजी विद्यापीठाशी कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील एकूण २७५ महाविद्यालये संलग्नित आहेत. पैकी १७१ महाविद्यालयांचे मूल्यांकन झाले असून, ८६ महाविद्यालये मूल्यांकनाच्या प्रक्रियेत आहेत.

3 1 MAR 2023
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठातील विद्यार्थिनीची जपानला भरारी




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या विदेशी भाषा विभागातील विद्यार्थिनी पूर्वा नाडगोडा हिची फुजित्सु लिमिटेड या जपानी कंपनीमध्ये नियुक्ती झाली आहे. त्याबद्दल तिचा विभागप्रमुख डॉ. मेघा पानसरे यांनी सत्कार केला. यावेळी शेजारी स्नेहल शेट्ये उपस्थित होत्या.**

कोल्हापूर, ता. ३० : शिवाजी विद्यापीठाच्या विदेशी भाषा विभागातील विद्यार्थिनी पूर्वा नाडगोडा हिची फुजित्सु लिमिटेड या जपानी कंपनीमध्ये नियुक्ती झाली आहे. ती कंपनीच्या कामाकरिता दोन वर्षांसाठी जपानमधील टोकियो येथे जाणार आहे.

पूर्वा हिने विदेशी भाषा विभागामधून जपानी भाषेचा प्रमाणपत्र आणि पदविका अभ्यासक्रम पूर्ण केला. जेएलपीटी या आंतरराष्ट्रीय परीक्षेच्या मार्गदर्शनाचा लाभ घेतला आणि ती परीक्षा उत्तीर्ण झाली. विदेशी भाषा विभाग प्रमुख डॉ. मेघा पानसरे यांच्या हस्ते तिचा सत्कार करण्यात आला. पूर्वा हिने मिळवलेले हे यश विद्यापीठासाठी भूषणावह आणि इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी असल्याचे डॉ. पानसरे यांनी सांगितले. पवन नाडगोडा, जपानी भाषा शिक्षिका स्नेहल शेट्ये आदी उपस्थित होते. माझ्या यशात शिवाजी विद्यापीठाचा खूप मोठा वाटा आहे. विदेशी भाषा विभागातील अभ्यासक्रमाचा मोठा फायदा होतो. कोल्हापूरमध्ये शिकूनही अशा संधी मिळू शकतात, असे पूर्वा नाडगोडा हिने सांगितले.

सकाळ

# डॉ. सुखदेव थोरात यांना प्रा. डॉ. जे. एफ. पाटील मेमोरियल ॲवॉर्ड जाहीर

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**



शिवाजी युनिव्हर्सिटी इकॉनॉमिक असोसिएशन (अर्थशास्त्र परिषद) च्या वतीने देण्यात येणारा डॉ. जे.एफ. पाटील ॲवॉर्ड यूजीसीचे माजी अध्यक्ष डॉ. सुखदेव थोरात यांना जाहीर करण्यात आला. आज (शुक्रवारी) दुपारी साडेचार वाजता विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहात कुलगुरू डॉ.डी.टी.शिर्के यांच्या हस्ते पुरस्कार देण्यात येणार आहे. ५१ हजार रुपये रोख, मानपत्र, सन्मानचिन्ह, शाल, श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

पुरस्काराचे हे पहिलेच वर्ष आहे. डॉ.जे.एफ.पाटील यांचे शैक्षणिक क्षेत्रातील योगदान मोलाचे आहे. त्यांनी शिवाजी विद्यापीठामध्ये प्राध्यापक, विभागप्रमुख, संचालक बीसीयूडी व महाराष्ट्र राज्य नियोजन मंडळाचे सदस्य अशा विविध पदांवर काम केले आहे. त्यांच्या बहुमोल योगदानाची स्मृती कायम राहावी, यासाठी शिवाजी युनिव्हर्सिटी इकॉनॉमिक असोसिएशनच्या वतीने दर दोन वर्षांनी पुरस्कार दिला जाणार आहे.

3 1 MAR 2023

जनसंपर्क कक्ष
सकाळ
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. थोरात यांना 'जे. एफ. पाटील अॅवॉर्ड'



डॉ. थोरात

कोल्हापूर, ता. ३० : विद्यापीठ अनुदान आयोगाचे (यूजीसी) माजी अध्यक्ष प्रा. डॉ. सुखदेव थोरात यांना आज, शुक्रवारी दुपारी साडेचार वाजता 'प्रो. डॉ. जे. एफ. पाटील मेमोरियल अॅवॉर्ड'ने सन्मानित केले जाणार आहे. विद्यापीठातील मानव्यशास्त्र सभागृहातील या कार्यक्रमात कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते पुरस्कार वितरण होईल. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील उपस्थित असतील. दरम्यान, कै. ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. जे. एफ. पाटील यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ त्यांचे कुटुंबीय आणि माजी विद्यार्थी, शिवाजी विद्यापीठ अर्थशास्त्र परिषदेने संकलित केलेल्या देणगीतून या पुरस्काराची यावर्षीपासून सुरुवात करण्यात आली आहे. ५१ हजार रुपये रोख, मानपत्र, सन्मानचिन्ह, शाल व श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. प्रा. थोरात हे विख्यात अर्थतज्ज्ञ असून, अनेक केंद्रीय संस्थांचे ते प्रमुख राहिलेले आहेत. वर्ष २००८ मध्ये भारत सरकारने त्यांना पद्मश्री या पुरस्काराने सम्मानित केले आहे. ते देश-विदेशातील अनेक विद्यापीठांचे मानद प्राध्यापक म्हणून सध्या कार्यरत आहेत.

तरूण भारत

# डॉ. सुखदेव थोरात यांना आज डॉ.जे.एफ.पाटील ॲवॉर्ड प्रदान

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्यावतीने पहिलेच 'डॉ. जे. एफ. पाटील मेमोरियल ॲवॉर्ड पुरस्कार 'युजीसी''चे माजी अध्यक्ष डॉ. सुखदेव थोरात यांना देण्यात येणार आहे. शिवाजी विद्यापीठात शुक्रवारी ३१ रोजी दुपारी ४.३० वाजता कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते ॲवॉर्ड वितरण सोहळा होणार आहे. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांची प्रमुख उपस्थिती आहे, अशी माहिती कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आणि अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. विद्या कट्टी यांनी दिली. ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ स्व. डॉ. जे.एफ.पाटील यांचे शैक्षणिक क्षेत्रातील कार्य अतुलनीय आहे. प्राध्यापक म्हणून शिवाजी विद्यापीठात रूजू झालेल्या डॉ. पाटील यांनी अधिविभाग प्रमुख, बीसीयुडीचे संचालक म्हणून प्रशासकीय कार्याचा वेगळा ठसा उमटवला. त्यांच्या स्मृती चिरंतन राहाव्या, यासाठी शिवाजी विद्यापीठाने दर दोन वर्षातून डॉ. जे. एफ. पाटील मेमोरियल अवॉर्ड देण्याचा निर्णय घेतला आहे. हा पहिला ॲवॉर्ड वितरण सोहळा शुक्रवारी होत आहे.

31 MAR 2023

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### जागर दुर्मीळ वाद्यांचा व भावतरंग बहारदार गाण्यांचा कार्यक्रम : ५९ व्या दीक्षांत सोहळ्यानिमित्त आयोजन

# पाश्चिमात्य, दाक्षिणात्य वाद्यांच्या मिलाप

प्रतिनिधी
कोल्हापूर

पाश्चिमात्य वाद्य आणि दाक्षिणात्य वाद्य यांचा मिलाप साधणारे दुर्मीळ आणि पारंपरिक वेगवेगळ्या वाद्यांचे सादरीकरण एकाच व्यासपीठावर सादर करण्यात आले. निमित्त होते शिवाजी विद्यापीठ ५९ व्या दीक्षांत समारंभाचे. बॅ.बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्त्रोत केंद्र, संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने जागर दुर्मीळ वाद्यांचा व भावतरंग या बहारदार गाण्यांच्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात हा



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ५९ व्या दीक्षांत समारंभानंतर वाद्य व गीतांचे सादरीकरण करताना विद्यार्थी.

कार्यक्रम झाला.

ढोलकी, पखवाज, दिमडी, हलगी, धनगरी ढोल, संबळ या महाराष्ट्रीयन वाद्यांद्वारे लावणी, वाघ्या मुरळी, गोंधळ, नमन, दशावतार, गण–गवळण, पोवाडा यांचे उत्तम सादरीकरण करण्यात आले. थविल, मुरासु, उडुम्मई, इडम्मा, इदालम, मोडा मेलम, कोट्टू मेलम, चेंडा, मृदंगम, गंजिरा, सिंगारी मेलम, थप्पू पराई, पंचई ईसाई या दाक्षिणात्य वाद्यांद्वारे हरिनामसंकिर्तन, सलंगाई मेलम, देवी श्लोक, गणेश स्तुती यांचे संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाचे विद्यार्थी ऋषिकेश देशमाने व साथीदारांनी सादरीकरण केले भावतरंग कार्यक्रमात लोकगीत, भावगीतं, सिनेगीत, भक्तीगीत, प्रेमगीत, लावणी, द्वंदगीत यांच्या सादरीकरणाने उपस्थित प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. यावेळी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र–कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, आजीवन अध्ययन केंद्र संचालक डॉ. रामचंद्र पोवार, क्रीडा अधिविभागप्रमुख डॉ. शरद बनसोडे, विद्यार्थी विकास विभागाचे प्रभारी संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, संगीत अधिविभागप्रमुख डॉ. अंजली निगवेकर, डॉ. विनोद ठाकुर–देसाई, निखिल भगत, ज्ञानस्त्रोत केंद्राचे संचालक डॉ. धनंजय सुतार, उपग्रंथपाल डॉ. प्रकाश बिलावर उपस्थित होते.

